# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक:१९६७, मुंबई :४००००१.

दूरध्वनी- २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१ फॅक्स नं.२६९२१०२

तार- EDUTECH E_mail desk7@dte.org.in internet :- http://www.dte.org.in


कालमर्यादित
दि.१०.०९.२००८
प्रथम प्राधान्य

क्रमांक :७/अर्थसं/२००८-०९/९०
दिनांक : २०.०८.२००८

संचालक / प्राचार्य

१. अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र महाविद्यालये/ व तत्सम पदवी / पदविका संस्था
२. सर जे.जे.कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, मुंबई
३. कुलसचिव,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,
लोणेरे, ता.माणगाव, जि.रायगड

विषय : अर्थसंकल्पिय अंदाज २००९-१० आणि सुधारीत अंदाज २००८-०९ (योजनेतर) प्रस्ताव पाठविणेबाबत.

उपरोक्त विषयासंदर्भातील या संचालनालयाने तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांना लिहिलेले पत्र क्र. १५/अर्थसं/अर्थ.सुधा/२००८-०९/२७०, दि.१३.०८.०८ अन्वये शासकीय संस्थांचे, उपरोक्त विषयात नमूद केलेल्या वर्षाचे अंदाजपत्रक सादर करण्याविषयी कळविले आहे.

सर्व अशासकीय अनुदानित संस्थांचे उपरोक्त वर्षाचे अंदाजपत्रक संकलित करुन तद्संबंधीचा एकत्रित प्रस्ताव या संचालनालयाच्या स्तरावर तयार करण्यात येऊन शासनास सादर करावयाचा असल्याने या संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित संस्थांनी त्यांच्या संस्थेचे अर्थसंकल्पिय अंदाज २००९-१० आणि सुधारीत अंदाज २००८-०९ या संचालनालयास ***दिनांक १०.०९.२००८*** पर्यंत पाठवावेत व त्याची एक प्रत संबंधित विभागीय कार्यालयासही सादर करावी.

**संस्थेचे अंदाजपत्रक सादर करतांना त्यासाठी विहीत केलेली प्रपत्रे संस्थांनी संबंधित विभागीय कार्यालयाकडून त्वरीत उपलब्ध करुन घ्यावयाची असून विहीत प्रपत्रात तयार केलेले अंदाजपत्रक टपालाने न पाठवता ते ज्या कर्मचा-याने / अधिका-याने तयार केलेले आहे, त्याचप्रमाणे ज्यांना अर्थसंकल्पाबाबतचे ज्ञान अवगत आहे अशा कर्मचा-यांसोबतच उपरोक्त परिच्छेद क्रमांक २ मध्ये निश्चित केलेल्या तारखेस या संचालनालयास सादर करावयाचे आहे. विहीत मुदतीनंतर आलेले अंदाजपत्रक कुठल्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाही किंवा संस्थेसाठीच्या अनुदान तरतूदीसाठीचा अंदाजपत्रक प्रस्ताव शासनास सादर केला जाणार नाही. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थाप्रमुखांवर राहील, याची कृपया नोंद घ्यावी.**

सदरचे अंदाजपत्रक पाठवितांना खालीलप्रमाणे दर्शविण्यात आलेल्या बाबी लक्षात घेऊन अंदाजपत्रक तयार केलेले असावे.

१. शासनाने विहीत केलेल्या एकूण अठरा प्रपत्रांपैकी प्रपत्र क्र.५,६,८ व ९ हया प्रपत्रातील माहिती वगळून उर्वरीत सर्व प्रपत्रातील माहिती पुरविण्यात यावी. ज्या प्रपत्रातील माहिती अपूर्ण किंवा चुकीची आढळेल ते प्रपत्र स्विकारले जाणार नाही.
२. शासनाच्या दि.१.०४.२००४ च्या शासन निर्णयान्वये संस्थेसाठी मंजूर असलेली पदे, नव्योन निर्माण करण्यात आलेली पदे व दि.१४.०१.२००३ च्या शासन निर्णयान्वये अतिरीक्त ठरविण्यात आलेली परंतू सद्यस्थितीत त्या पदावर कार्यरत अधिसंख्य पदांची माहिती एकत्रित करुन प्रपत्र ३ अ मध्ये दर्शविण्यात यावी. त्याचप्रमाणे सद्यस्थितीत अधिसंख्य असलेल्या पदांबाबतची माहिती प्रपत्र ३ ड मध्ये दर्शविण्यात यावी.
३. ज्या पदांचा मंजूर पदांमध्ये व अतिरीक्त पदांमध्ये अंतर्भाव करण्यात आलेला नाही अशा पदांबाबतची माहिती स्वतंत्ररित्या विहीत नमून्यात सादर करण्यात यावी.
४. सदरचा प्रस्ताव पाठवितांना वेळोवेळी लागू होणा-या महागाई भत्त्याची वाढ दर्शविण्यात यावी. त्याचप्रमाणे इतर बाबींवर होणा-या वाढीचाही विचार करण्यात यावा.
५. आश्वासित प्रगती योजना, वरिष्ठ श्रेणी / निवड श्रेणी याबाबत देय ठरणा-या थकबाकीच्या रकमेचा देखिल अंतर्भाव करण्यात येवून त्याचे स्वतंत्र विवरणपत्रदेखील जोडावे.
६. वैद्यकीय प्रतिपूर्तीचे प्रस्ताव मंजूरीसाठी सादर केलेले असल्यास त्या रकमांचा देखिल अंतर्भाव करण्यात यावा.
७. वेतनेत्तर खर्च गाहय असलेल्या बाबींबाबत व अनुदान खर्चाच्या मर्यादेत निगडीत दर्शविण्यात यावा.
८. भाडेपट्टी व कर आणि विमा इत्यादी मान्य दरानुसारच देण्यात यावा.

वर दिलेल्या सूचनांप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात यावे व या कार्यालयास सादर करावे अन्यथा उशिराने प्राप्त झालेले अंदाजपत्रक स्विकारले जाणार नाही याची पुन्हा जाणीव करुन देण्यात येत आहे.

सा.अ. २।२।०८

(सा.अ.रायकर)
सहाय्यक संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

प्रत माहिती व पुढील तात्काळ कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
त्यांनी सदर प्रकरणी आवश्यक असलेली प्रपत्रे त्वरीत त्यांच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित संस्थांना उपलब्ध करुन द्यावयाची असून त्यांच्या स्तरावर संचालनालयाने विहीत केलेल्या तारखेस अंदाजपत्रक सादर करण्याबाबतच्या सूचना द्यावयाच्या आहेत.
२. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १५, मुख्य कार्यालय, मुंबई